# बारामती शरद पवारांचीच हे सिद्ध- श्रीनिवास पवार

**पुणे (प्रतिनिधी)–** बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे यांचा विक्रमी मतांनी विजयी झाला आहे. बारामतीत पवार विरुद्ध पवार अशी लढाई झाली, पण बारामती ही शरद पवारांची आहे हे सिद्ध झालं आहे. राजकारण वेगळं आणि कुटुंब वेगळं असतं, त्यामुळे कौटुंबिक पातळीवर आम्ही एक आहोत आणि आमचे कुटुंब प्रमुख शरद पवारचं आहेत, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधु श्रीनिवास पवार यांनी अजित पवार यांचे नाव न घेता त्यांना अप्रत्यक्षरित्या टोला लगावला.

संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात शरद पवार विरुद्ध अजित पवार असा सामना रंगला होता. बारामतीमध्ये सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढाई झाली. त्यामध्ये सुप्रिया सुळे मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या. प्रतिष्ठेच्या या लढाईच्या निमित्ताने प्रचारादरम्यान, अनेक आरोप-प्रत्यारोप झाले, संपूर्ण पवार कुटुंबाचा पाठिंबा हा सुप्रिया सुळे यांना होता. तर सहानुभूती मिळवत आपल्याला एकटं पाडण्यात आल्याचा दावा अजित पवार यांनी केला. अखेर या लढाईमध्ये सुप्रिया सुळे यांचा दणदणीत विजय झाला आणि अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना दारूण पराभव पत्करावा लागला. या संपूर्ण निवडणुकीत पवार कुटुंबाच्या बाजूने बोलणारे, अजित पवार यांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी या निकालानंतर पुन्हा एकदा अजित पवारांवर हल्ला चढवला आहे. बारामती ही शरद पवार यांचीच हे सिद्ध झालं आहे, असं श्रीनिवास पवार म्हणाले.

# मराठवाड्यातील आठ मतदारसंघांत जरांगे फॅक्टर निर्णायक

**पुणे (प्रतिनिधी)–** लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात विशेषत: मराठवाड्यातील आठ मतदारसंघांत जरांगे फॅक्टर निर्णायक ठरल्याचे दिसत आहे. जरांगे यांचे आंदोलन हाताळण्यात यश न आल्यानेच सरकारला त्यांची किंमत चुकवावी लागल्याचे विश्लेषण राजकीय वर्तुळातून केले जात आहे.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मतदारांनी महाविकास आघाडीला ३० जागांचे भरभरून दान दिले. तर महायुतीला मात्र १७ जागांपर्यंतच वेसण घालण्यात आली. यामध्ये मराठवाड्यात महायुतीला मोठा फटका बसला असून, त्याला जरांगे फॅक्टरच प्रामुख्याने कारणीभूत ठरल्याची मांडणी केली जात आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर रान उठविणाऱ्या जरांगे यांचे आंदोलन सुरुवातीला सरकारने अलगदपणे हाताळले खरे. मात्र, नंतरच्या टप्प्यात जरांगे व सरकारमध्ये खटके उडाले. विशेषत: फडणवीस यांच्याशी जरांगे यांचे बिनसले अन् तिथून या दोघांमध्ये संघर्ष सुरू झाला. त्यानंतर प्रत्यक्ष निवडणुकीत जरांगे यांनी ज्याला पाडायचे त्याला पाडा, असे सूचक आवाहन केले. जरांगे यांच्या भूमिकेचा निवडणुकीवर फारसा परिणाम होणार नाही, असा विश्लेषकांचा अंदाज होता. मात्र, तो साफ खोटा ठरला.

जरांगे यांच्याशी थेट संबंधित असलेल्या जालना व बीडमध्ये हा फॅक्टर प्रकर्षाने दिसला. बीडमध्ये मराठा विरुद्ध वंजारी अशीच लढत झाली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत भाजपाच्या पंकजा मुंडे यांना राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या बजरंग सोनवणे यांच्याकडून हार पत्करावी लागली. तेथे जरांगे यांनी सोनवणे यांच्यामागे बळ उभे केल्याने ही प्रतिष्ठेची लढत मुंडे यांना सहा हजार ५८५ मतांनी गमवावी लागली. जालन्यात पाच टर्म निवडून आलेल्या रावसाहेब दानवे यांना काँग्रेसच्या कल्याण काळे यांनी याच पाठबळावर हिसका दाखवला. तेथे दानवे तब्बल लाखभर मतांनी पराभूत झाले. परभणीत संजय जाधव यांच्यासाठी उद्धव ठाकरे यांच्याबद्दलची सहानुभूती, त्यांचे स्वत:चे वलय याबरोबरच जरांगे यांची जादूही सहाय्यभूत ठरली. त्यामुळे ते तब्बल १ लाख ३३ हजार मतांनी विजयी झाले. नांदेडमध्ये अशोक चव्हाण यांना महायुतीत घेऊनही भाजपाच्या प्रतापराव चिखलीकर यांना काँग्रेसच्या वसंत चव्हाण यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. तेथेही जरांगे समर्थकांची ताकद महत्त्वाची ठरल्याचे बोलले जाते. हिंगोलीत ठाकरे सेनेच्या नागेश पाटील यांनी शिंदेसेनेच्या बाबूराव कदम यांना दणका दिला. त्यांनाही लाखांचे मताधिक्य मिळाले. तेथेही मराठ्यांचा टक्का निर्णायक ठरल्याचे निरीक्षण मांडण्यात येते. तर औरंगाबादमध्ये ठाकरेसेनेचे उमेदवार चंद्रकांत खैरे व एमआयएमचे इम्तियाज जलील यांच्याऐवजी मराठा नेते म्हणून महायुतीच्या संदीपान भुमरे यांना पसंती दिली गेल्याचे दिसून आले.

नगरमध्ये जरांगे फॅक्टरने नगरच्या हक्काच्या विखेंच्या सीटलाही धक्का दिला. तेथे राष्ट्रवादीच्या नीलेश लंके यांनी भाजपाच्या सुजय विखे पाटील यांच्यावर सनसनाटी विजय मिळविला. नाशिकमध्येही महाविकास आघाडीचे राजाभाऊ वाजे यांच्या विजयात जरांगे फॅक्टरने हातभार लावल्याचे दिसून आले. याशिवाय बारामती, माढ्यासह प. महाराष्ट्रातील काही मतदारसंघातही हा फॅक्टर कमी अधिक प्रमाणात चालल्याचे म्हटले जाते. इतकेच नव्हे, तर राखीव मतदारसंघांमध्ये याचा परिणाम दिसला. जेथे राखीव मतदारसंघ असेल, तेथे महाविकास आघाडीचा उमेदवार चालविला गेला. त्यामुळे शिर्डीत महाविकास आघाडीचे भाऊसाहेब वाकचौरे हे वन वे निवडून आले. तर लातूरमध्ये महाविकास आघाडीच्या शिवाजीराव काळगे यांनी भाजपाच्या सुधाकर श्रृंगारे यांच्यावर ६१ हजार मतांनी मात केली. मराठा समाजाकडून कधीही कोणत्याही पक्षाला एकगठ्ठा मतदान होत नाही, असे समीकरण मांडण्यात येते. मात्र, या निवडणुकीत मराठ्यांची मते एका बाजूला मोठ्या प्रमाणात झुकविण्यात मनोज जरांगे हे यशस्वी ठरले आहेत. त्याचा रिझल्टही त्यांना मिळाला आहे. महाविकास आघाडीकडून अनेक मराठा उमेदवार भरभरून मतांनी निवडून आले आहेत. त्यामुळे लोकसभेनंतर आता विधानसभेतही जरांगे फॅक्टरबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. जरांगे पुढच्या निवडणुकीतही आपला प्रभाव टिकवून ठेवणार का, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष असेल.

## पान १ वरुन

### एनडीएच्या नेतेपदी मोदींची निवड

७ जून रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. यामध्ये नरेंद्र मोदी यांची औपचारिकपणे नेतेपदी निवड होणार आहे. यानंतर ८ जून रोजी मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत भाजपला २४० जागा मिळाल्या आहेत. बहुमताच्या आकड्यापेक्षा (२७२) ही संख्या ३२ कमी आहे. मात्र, एनडीएने २९२ जागांसह बहुमताचा आकडा पार केला.

चंद्राबाबूंचा टीडीपी १५ जागांसह एनडीएमधील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे आणि नितीश यांचा जेडीयू १२ जागांसह एनडीएमधील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. भाजपसाठी यावेळी दोन्ही पक्ष आवश्यक आहेत. त्यांच्याशिवाय भाजपला सरकार स्थापन करणे अवघड आहे.

**एनडीएच्या बैठकीत १६ पक्षांचे २१ नेते उपस्थित**

१. नरेंद्र मोदी,पीएम २. जे.पी. नड्डा, भाजप अध्यक्ष ३. राजनाथ सिंह, संरक्षण मंत्री ४. अमित शाह, गृहमंत्री ५. चंद्राबाबू नायडू, टीडीपी ६. नितीश कुमार, जेडीयू ७. एकनाथ शिंदे, शिवसेना ८. कुमारस्वामी, जेडी(एस) ९. चिराग पासवान, एलजीपी (आरव्ही) १०. जीतन राम मांझी,एचएएम ११. पवन कल्याण, जेएसपी १२. सुनील तटकरे, राष्ट्रवादी १३. अनुप्रिया पटेल, एडी (एस) १४. जयंत चौधरी, आरएलडी १५ प्रफुल्ल पटेल, राष्ट्रवादी १६. प्रमोद बोरो, यूपीपीएएल १८. इंद्रा हंग सुब्बा, एसकेएम +१९. सुदेश महतो, एजेएसयू २०. राजीव रंजन सिंह, जेडीयू २१. संजय झा, जेडीयू.यावेळी सर्व पक्षांनी आपले समर्थन पत्र मोदींना दिले

दरम्यान, पंतप्रधान मोदींनी बुधवारी दुपारी २ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. मंत्रिमंडळ बरखास्त करण्याची शिफारसही राष्ट्रपतींनी केली. तसेच नवीन सरकार येईपर्यंत त्यांना आणि मंत्रिमंडळाला पदावर राहण्याची विनंती केली. १७ वी लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस बैठकीत करण्यात आली. त्यात सरकारने तिसऱ्यांदा विजयी झाल्याबद्दल धन्यवाद प्रस्ताव मंजूर केला. यानंतर मोदींनी राष्ट्रपती भवनात जाऊन राजीनामा सादर केला. मोदी आता कार्यवाहक पंतप्रधान असतील.

### विरोधात बसणार

संजय सिंह, आप, राघव चड्ढा, आप, ओमर अब्दुल्ला, जेकेएनसी, सय्यद सादिक अली शिहाब थांगल, आययूएमएल. पी.के. कुनहालीकुट्टी, आययूएमएल, जोस के मणी, केसी (एम), थिरु थोल. थिरुमावलावन, व्ही.सी.के, डी. रविकुमार, व्ही. सी.के. एन.के. प्रेमचंद्रन, आरसीपी. डॉ. एम.एच. जवाहिरुल्ला, एमएमके. जी देवराजन, एआयएफबी. थिरू ईआर इसवरन, केएमडीके.

### विखेंच्या त्रासाला कंटाळून अनेक भाजप नेत्यांची लंकेंना मदत

ती दिसत नाही. सुपे येथे खुनशी प्रवृत्तीने व सूडबुद्धीने कारवाई झाली. सामान्यांना त्रास दिल्यावर त्यांच्यातून उद्रेक होतो, हे भाजपच्या काही जणांनी दाखवून दिले आहे व त्यांनी लंके यांना साथ दिली आहे, असा दावा करून फाळके म्हणाले, आम्ही विजयाने हुरळून जाणार नाही, पण त्यांना पराभव पचवता येईल की नाही हा प्रश्न आहे. यापुढे त्यांनी सामान्यांना त्रास देऊ नये. ते कॅबिनेट मंत्री असल्याने त्यांचा राजीनामा मागण्याचा अधिकार महाविकास आघाडीचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांना आहे व ते त्यावर भाष्य करतील, पण फडणवीस यांच्यासारखी शिस्त व नैतिकता पालकमंत्री दाखवतील का असा माझा त्यांना सवाल आहे, असेही फाळके म्हणाले.

दरम्यान, तुतारीशी साधर्म्य असलेले पिपाणी चिन्ह मिळालेल्या उमेदवाराला ४४ हजार ५०० मते मिळाली आहेत. १७ पेक्षा जास्त उमेदवार असल्याने दोन ईव्हीएम मशीन होते, पहिल्या ईव्हीएमच्या दुसऱ्या क्रमांकावर लंके यांचे नाव होते तर दुसऱ्या ईव्हीएमच्या दुसऱ्या क्रमांकावर तुतारी साधर्म्य असलेले चिन्ह असलेल्या उमेदवाराचे नाव होते. त्या उमेदवाराला कोणीही ओळखत नाही. त्यामुळे त्याला मिळालेल्या मतांपैकी किमान ४० हजार मते लंके यांची आहेत, असा दावाही फाळके यांनी केला.

### देवेंद्र फडणवीस राजीनाम्यावर ठाम

त्यामुळे लोकसभा निवडणुकीत पक्षाला जो फटका बसला, ज्या जागा कमी आल्या त्याची जबाबदारी मी स्वीकारत आहे. त्यामुळे आता विधानसभेच्या तयारीसाठी पूर्णवेळ उतरायचे आहे. त्यासाठी मला सरकारमधून मोकळे करावे आणि पक्षात पूर्णवेळ काम करण्याची संधी द्यावी, अशी विनंती पक्षाला करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षसंघटनेत जर काही कमतरता असतील तर त्या मला दूर करता येतील. सरकारमधून बाहेर राहिलो तरी आम्हाला जे काही करायचे आहे ते आमची टीम करेल. मी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेणार असून त्यांच्या मार्गदर्शनानेच पुढच्या गोष्टी करणार असल्याचे फडणवीस म्हणाले.

पंडित नेहरु यांच्यानंतर १९६२ नंतर प्रथमच तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्यासाठी देशातील जनतेते नरेंद्र मोदी यांना कौल दिला आहे. देशात जितक्या जागा इंडिया आघाडीला मिळाल्या आहेत, त्यापेक्षा जास्त जागा भाजपला मिळाल्या आहेत. इंडिया आघाडीने तयार केलेल्या नॅरेटिव्हला आम्ही उत्तर देऊ शकलो नाही ही बाब खरी आहे. महाराष्ट्रात आम्हाला अपेक्षित यश मिळाले नाही.खूप कमी जागांवर आमचा विजय झाला आहे. आमची लढाई तीन पक्षांशी होती, तशी ती नॅरेटिव्हशी होती. संविधान बदलणार हा अपप्रचार रोखण्यात आम्ही अपयशी झालो. आम्हाला जो जनादेश दिला आहे तो शिरसावंद्य आहे. ज्यांच्या जास्त जागा आल्या आहेत त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. आम्ही का पराजित झालो याची मीमांसा केली पाहिजे. महाविकास आघाडीला ३० जागा मिळाल्या आहेत. त्यांना ४३.९१ तर महायुतीला ४३.६० टक्के मते मिळाली आहेत. मुंबईत महाविकास आघाडीला चार जागा मिळाल्या असल्या तरी त्यांना २४ लाख ६२ हजार मते तर आम्हाला २६ लाख ६७ हजार मते पडली आहेत. भाजपच्या आठ जागा या ४ टक्के, ६ जागा ३० हजार तर काही जागा २ ते ३ हजाराने हरल्या आहेत. त्यामुळे यापुढील काळात पक्षसंघटनेची नव्याने बांधणी करण्याची गरज आहे. कितीही आकडेवारी मांडली तरी जागा कमी आल्या आहेत हे वास्तव आहे. त्याची जबाबदारी कुणीतरी स्वीकारली पाहिजे. देवेंद्र फडणवीस म्हणून मी ही जबाबदारी स्वीकारतो, असे सांगत फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाच्या राजीनाम्याचा मनोदय बोलून दाखवत हा निर्णय पक्षावर सोपवला. मी सरकारमध्ये राहणार नसलो तरी माझे सहकारी सरकारमध्ये असतील, त्यांना योग्य वेळी मार्गदर्शन करेन. मी पळून जाणारा नेता नाही. नवीन बांधणी करून जनतेचा विश्वास संपादन करून विधानसभेला सामोरे जाऊ, असेही फडणवीस म्हणाले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे भाजपला भोवल्याचेही फडणवीस यांनी मान्य केले. ते म्हणाले, कांदा प्रश्नांचा मोठा परिणाम मतदानावर झाला. जागतिक बाजारपेठेमुळे अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागले. सोयाबीन आणि कापसाचे दर पडले होते. त्यासाठी आम्ही भावांतर योजना आणली पण आचारसंहितेमुळे पैसे देऊ शकलो नाही. त्याचा मोठा फटका आम्हाला बसला. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर विरोधकांनी नॅरेटिव्ह तयार केले. मराठवाड्यात त्याचा फटका बसला. सरकारने मराठ्यांना आरक्षण देऊनही त्याबाबत आम्ही सांगू शकलो नाही, अशी खंत फडणवीस यांनी व्यक्त केली. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देण्याचे संकेत दिल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी धाव घेत त्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली.

**फडणवीस यांच्याशी बोलणार– शिंदे**

देवेंद्र फडणवीस यांनी निकालाबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या असल्या तरी मी याबाबत त्यांच्याशी बोलेन. पराभव ही सामूहिक जबाबदारी असते. आम्ही तिन्ही पक्षांनी एकत्रित काम केले आहे. मतांची टक्केवारी बघितली तरी मुंबईत आम्हाला दोन लाख मते जास्त मिळाली आहेत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी दिल्लीत प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

### ग्रामपंचायत निधीचा संशयीत अपहार केल्याचा ठपका

सदरचा आदेश बजावल्याच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतून ग्रामसेवक या पदावरुन निलंबित करण्यात आले आहे. तसेच आदेश अंमलात राहील तेवढ्या कालावधीत राजेश तगरे यांचे मुख्यालय पंचायत समिती अकोले, तर मेघश्याम गायकवाड यांचे मुख्यालय पंचायत समिती, जामखेड राहणार असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

### शिक्षक मतदारसंघासाठी मतदानाच्या वेळेत वाढ

यांनी अपक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असे दोन अर्ज सादर केले आहेत. महेंद्र मधुकर भावसार (धुळे) यांनी अपक्ष व नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी असे दोन अर्ज सादर केले आहेत. दत्तात्रय भाऊसाहेब पानसरे (नगर) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून अर्ज सादर केला आहे. काल एकही उमेदवाराने नामनिर्देशन अर्ज नेले नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

दरम्यान निवडणूकीच्या मतदानाची वेळ याआधी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. परंतू या वेळेत बदल करण्यात आला आहे. मतदानाची सुधारित वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतची निश्चित करण्यात आली आहे.

### एकाच कुटुंबातील पाच सदस्य संसद गाजवणार

भोजपुरी सुपरस्टार दिनेश लाल यादव यांचा पराभव केला. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, धर्मेंद्र यादव यांना ५,०८,२३९ मते मिळाली तर दिनेश लाल यांना ३,४७,२०४ मते मिळाली आहेत

अखिलेश यादव यांचे कुटूंबीय अक्षय यादव यांनी फिरोजाबाद मतदारसंघातून भाजपचे विश्वदीप सिंह यांचा ८९,३१२ मतांनी पराभव केला आहे. आकडेवारीनुसार अक्षय यादव यांना एकूण ५,४३,०३७ इतकी मते मिळाली आहेत. अक्षय यादव यांनी २०१४ मध्ये याच जागेवरून विजय मिळवला होता. परंतु २०१९ मध्ये चंदन सिंह यांच्याकडून पराभूत झाले होते.

समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवपाल यादव यांचे चिरंजीव आदित्य यादव यांनी भाजपच्या दुर्विजय सिंह शाक्य यांचा ३४,९९१ मतांनी पराभव केला आहे. आदित्य यांना एकूण ५,०१,८५५ आणि शाक्य यांना ४,६६,८६४ मते मिळाली. यादव कुटुंबाची ही एकमेव जागा होती जिथे पराभव होण्याची जास्त भीती होती परंतु शेवट आदित्य यादव यांचा विजय झाला.

दरम्यान, अखिलेश यादव यांच्या कुटुंबातील एकूण पाच जणांनी निवडणूक लढवली होती. यातील सर्व उमेदवार विजयी झाले असून ते संसदेत जाणार आहेत.

# शिंदे गटाची भाजपवर कुरघोडी

## मुंबई पदवीधरमधून शिंदे गटाचे डॉ. सावंत यांचा अर्ज दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात लोकसभा निवडणुकीत भाजपपेक्षा कमी जागा लढवूनही बऱ्यापैकी यश मिळविणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत उमेदवार उभा करून भाजपवर कुरघोडी केली आहे. शिंदे गटाच्या वतीने मुंबई पदवीधरमधून माजी मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी बुधवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे विधान परिषदेच्या चार जागांच्या निवडणुकीसाठी सत्ताधारी महायुतीत चुरस वाढली आहे.

विधान परिषदेच्या कोकण आणि मुंबई पदवीधर तसेच मुंबई आणि नाशिक शिक्षक मतदारसंघासाठी येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ७ जून २०२४ अशी आहे. शिंदे गटाचे उमेदवार दीपक सावंत हे काल, मंगळवारी उमेदवारी अर्ज भरणार होते. मात्र, लोकसभा निवडणुकीची मतमोजणी आणि निकालामुळे सावंत यांनी आज कोकण भवन येथे जाऊन मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे सचिव संजय मोरे उपस्थित होते. लोकसभा निवडणूक एकत्र लढविणाऱ्या महायुतीने विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी आपापले उमेदवार रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महायुतीतील बेबनाव समोर आला आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत १२ जून २०२४ अशी आहे. या मुदतीत महायुतीत एकत्र निवडणूक लढविण्याचा निर्णय झाला नाही तर विधान परिषदेसाठी महायुतीत मैत्रीपूर्ण लढत अटळ आहे. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या मनसेने कोकण पदवीधर मतदारसंघातून अभिजित पानसे यांना उमेदवारी दिली आहे. तर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिवाजीराव नलावडे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपने विधान परिषदेच्या कोकण पदवीधरमधून निरंजन डावखरे, मुंबई पदवीधरमधून किरण शेलार तर मुंबई शिक्षकमधून शिवनाथ दराडे यांना उमेदवारी दिली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अनिल परब आणि ज. मो. अभ्यंकर यांनी आज अनुक्रमे मुंबई पदवीधर आणि मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. तर नाशिक शिक्षकमधून संदीप गुळवे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

दरम्यान, काँग्रेसने विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघातून रमेश श्रीधर कीर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. कीर हे आज, गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज भरण्याची शक्यता आहे

# बालसुधारगृहातील कोठडीत १२ जूनपर्यंत वाढ

**पुणे (प्रतिनिधी)–** कल्याणीनगर येथे पोर्श कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाची बाल सुधारगृहातील १४ दिवसांची कोठडी बुधवारी संपुष्टात आली. त्यानंतर पुणे पोलिसांनी सदर मुलगा बाल सुधारगृहातून बाहेर आल्यास त्याच्या जीवितास धोका असल्याचे सांगत तसेच तो पुराव्यांशी छेडाछाड करून ते नष्ट करू शकतो, अशी कारणे देत सदर मुलाची १४ दिवसांची बाल सुधारगृहातील कोठडी वाढवून मिळण्याची मागणी तपास अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील तांबे यांनी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी जे. एम. चव्हाण यांच्या न्यायालयात केली. त्यानुसार न्यायालयाने मुलाचा बालसुधारगृहातील कोठडीत १२ जूनपर्यंत वाढ केली आहे.

याबाबत तांबे म्हणाले, मुलाचे आई, वडील आणि आजोबा हे पोलीस कोठडीत असून अशा परिस्थितीत मुलाच्या नातेवाईकांकडे त्याची कोठडी देणे योग्य होणार नाही. नातेवाईकांकडे कोठडी द्यावयाची असेल तर त्यांचे व्हेरिफिकेशन होणे महत्त्वपूर्ण आहे. अल्पवयीन आरोपी हा नातेवाईकांच्या मदतीने पुरावे नष्ट करू शकतो. सुरुवातीला बालन्यायालयाने त्यास जामीन मंजूर केला होता, त्यानंतर त्यानी घरी गेल्यावर पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून तीन गुन्हे दाखल झालेले आहेत. तसेच त्यास सज्ञान म्हणून सिद्ध करण्यासाठी पोलिसांकडे एक महिन्याची मुदत असून या कालावधीत योग्य पुरावे गोळा करून त्याबाबतचा अहवाल पोलीस न्यायालयात सादर करतील. त्यास सज्ञान ठरवण्याबाबतची तपासणी आणि चौकशी सुरू असताना त्यास सुधारगृहातून बाहेर पाठवणे योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे मुलास बालसुधारगृहातून बाहेर पाठवल्यास त्याच्या मानसिकतेवर परिणाम होण्याचीदेखील शक्मयता आहे. घटनेनंतर सदर मुलास जमावाने मारहाण केली असल्याने त्याच्या जीवितास यापुढील काळात धोका आहे. त्यामुळे त्यास १४ दिवसांची कोठडी देण्यात यावी.

बचाव पक्षाचे वकील प्रशांत पाटील म्हणाले, जे जे ॲक्टनुसार १४ दिवसांच्या कोठडीनंतर ती वाढवण्याबाबतची कोणतीही नियमावली नाही. त्यामुळे त्यास अधिकची कोठडी देणे योग्य होणार नाही. संबंधित अल्पवयीन मुलास योग्यवेळी जामीन मिळणे हा त्याचा कायदेशीर हक्क आहे.

# डॉक्टरांनी घेतलेले रक्त हे मुलाच्या आईचे

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील कल्याणीनगर भागात झालेल्या हिट अँड रनफ प्रकरणातील अल्पवयीन १७ वषीय आरोपीचा ब्लड रिपोर्ट बदलल्याप्रकरणी अटकेत असलेल्या ससून रुग्णालयातील फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे यांना सात जूनपर्यंत, तर मुलाचे वडील विशाल अग्रवाल आणि आई शिवानी अग्रवाल या आरोपींना दहा जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, रुग्णालयात डॉक्टरांनी घेतलेले रक्त हे मुलाच्या आईचे असल्याचे फॉरेन्सिक अहवालवरून स्पष्ट झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणातील संबंधित आरोपींना बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने डॉ. तावडे, डॉ. हळनोर आणि घटकांबळे यांना सात जूनपर्यंत, तर विशाल अग्रवाल आणि शिवानी अग्रवाल या आरोपींना दहा जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या वेळी ससून रुग्णालयात डॉक्टरांनी घेतलेले रक्त हे मुलाच्या आईचे असल्याचे फॉरेन्सिक अहवालवरून स्पष्ट झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

तपास अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील तांबे म्हणाले, या केसमध्ये एकूण सात आरोपी अटक करण्यात आली आहे. गुन्हा घडल्यावर ससून रुग्णालयात मुलाच्या रक्ताचा नमुना घेण्यात आला. मात्र, त्याबाबतचा डीएनए अहवाल प्राप्त झाला असून डॉक्टरांनी घेतलेले रक्त हे मुलाचे आईचे आहे, हे सिद्ध झाले आहे. आरोपी मुलाचे आई वडील यांनी कट रचून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आरोपी यांनी कशाप्रकारे गुन्हाच कट रचला. याबाबत एकत्रित तपास करणे गरजेचे आहे. सायबरतज्ज्ञांच्या मदतीने आरोपीचे मोबाईल विश्लेषण सुरू असून नवीन पुरावे समोर येत आहेत. आरोपींची साखळी स्पष्ट होण्यासाठी त्यांची सात दिवसांची पोलीस कोठडी आवश्यक आहे.

सरकारी वकील सुनील कुंभार म्हणाले, आरोपींना अटक केल्यापासून पोलीस चांगल्या प्रकारे तपास करून प्रगती करत आहेत. आरोपींची साखळी स्पष्ट करण्यात आली असून त्यांचा एकत्रित तपास होणे महत्त्वाचे आहे.

# शिक्षणमहर्षी विद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात



**तळेगाव दिघे (वार्ताहर)–** महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालय परिसरात सामाजिक कार्यकर्ते मतीन शेख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. जागतिक पर्यावरण दिनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी वृक्ष आणि पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला.

तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव जोंधळे विद्यालयात जागतिक पर्यावरण दिना निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शालेय परिसरातील वृक्षांना गांडूळ खत आणि पाणी दिले. प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते मतीन शेख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्रसंगी प्राचार्य एच. आर. दिघे, उपमुख्याध्यापक संजय दिघे, पर्यवेक्षक बी. सी. दिघे, ज्येष्ठ शिक्षक सुनील घुले, राष्ट्रीय हरित सेना प्रकल्प प्रमुख सुनील दिघे, संजय डोंगरे, अविनाश बिऱ्हाडे, एस. आर. दिघे, गोरख दिघे, संभाजी सुर्वे, ओंकार भागवत सहित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य एच. आर. दिघे यांनी वृक्ष आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्व सांगीतले. याप्रसंगी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी वृक्ष आणि पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला. सुत्रसंचालन राष्ट्रीय हरित सेना प्रकल्प प्रमुख सुनील दिघे यांनी केले.